**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातमीपत्र**

**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः08.04.2026** **वारः बुधवार**

---

1. महावितरण कंपनीचं; कृषी आणि बिगर कृषी अशा दोन कंपन्यांमध्ये विभाजन करण्याला राज्य मंत्रीमंडळाची मान्यता
2. राज्यात नवीन इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग स्थापन करण्यालाही मंत्रीमंडळाची मंजुरी
3. जागतिक आरोग्य दिनी, माझं गाव आरोग्य संपन्न गाव अभियानाचं औपचारिक उद्घाटन आणि
4. देशातल्या पहिल्या पॉड टॅक्सी प्रकल्पाचं मुंबईत मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन

**<u>राज्यमंत्रिमंडळ</u>**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड म्हणजेच महावितरण कंपनीचं; कृषी आणि बिगर कृषी अशा दोन कंपन्यांमध्ये विभाजन करण्याला राज्य मंत्रीमंडळानं काल मान्यता दिली. औद्योगिक, वाणिज्यिक, घरगुती आणि इतर सर्व बिगर कृषी ग्राहकांसाठीची वितरण यंत्रणा महावितरण कंपनी हाताळणार आहे. तर कृषी ग्राहकांचा वीज पुरवठा आणि संबंधित सेवा एमएसईबी सोलार ॲग्रो पॉवर लिमिटेड ही कंपनी हाताळणार आहे. बिगर कृषी वितरण क्षेत्रातील महावितरण या कंपनीला भांडवली बाजारात सूचीबद्ध करण्यासाठी आयपीओ आणण्यासही कालच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. शासन हमी असलेल्या 32 हजार 679 कोटी रुपयांच्या कर्जासाठी भांडवली बाजारात सरकारी रोखे आणण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.

राज्य शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनायाचं रुपांतर; इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयात करण्याचा निर्णयही काल राज्य मंत्रिमंडळानं घेतला. मंत्रालयीन विभाग, आयुक्त कार्यालय आणि सर्व जिल्ह्यांसाठी कायमस्वरुपी पदांचा समावेश असलेला नवीन माहिती तंत्रज्ञान संवर्गही निर्माण केला जाणार आहे.

आपत्ती व्यवस्थापनात खासगी भांडवलाच्या मदतीने वित्तपुरवठा उभारण्यासाठी महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम राबवायलाही मंत्रिमंडळान मंजुरी दिली. यासाठी जागतिक बँकेकडून 165 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणार आहे.

राज्यात गेल्या वर्षी ऑक्टोंबर ते डिसेंबर या कालावधीत झालेल्या अवकाळी पावसाच्या नुकसानीपोटी 1 लाख 80 हजार 574 शेतकऱ्यांना 128 कोटी 65 लाख रुपयांची मदत देण्यात आल्याची माहिती या बैठकीत देण्यात आली. यावर्षी जानेवारीपासून झालेल्या अवकाळी पावसाने राज्यात पिकांचं मोठं नुकसान झालं आहे; त्याच्या पंचनाम्याची कार्यवाही सुरू असल्याचं राज्य शासनातर्फे सांगण्यात आलं.

**माझं गाव आरोग्यसंपन्न गाव**

राज्यातील ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राज्य शासनानं 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' हे महत्त्वाकांक्षी अभियान सुरू केलं आहे. जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्तानं या अभियानाचं औपचारिक उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते काल करण्यात आलं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. या अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, रोगमुक्त आणि स्वयंपूर्ण करण्याचा राज्य

सरकारचा संकल्प आहे. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गावांना 'आरोग्यसंपन्न गाव' म्हणून गौरवण्यात येणार आहे.

**<u>मुंबईत मेट्रो</u>**

मुंबईत मेट्रो 9 आणि मेट्रो 2 बीच्या पहिल्या टप्प्यांला कालपासून सुरूवात झाली. पश्चिम उपनगरात दहिसर ते काशीगाव तसंच पूर्व उपनगरात मंडाळे ते चेंबूर मार्गावर या मेट्रो धावणार आहेत. ठाणे ते बोरीवली भुयारी मार्ग प्रकल्पासाठी खोदकामाचा प्रारंभही काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाला. या दुहेरी बोगद्याचं खोदकाम टीबीएमच्या साहाय्यानं केलं जाणार आहे. देशातल्या पहिल्या पॉड टॅक्सी प्रकल्पाचं भूमिपूजनही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं. मुंबईत कुर्ला ते वांद्रे-कुर्ला संकुल परिसरात हा प्रकल्प सुरू होणार आहे. या मार्गात दोनशे मीटरच्या अंतरावर 22 स्थानकं असतील. चालकाविना, बॅटरीवर चालणाऱ्या एका पॉड टॅक्सीमध्ये सहा प्रवासी बसू शकतील. दर 15 सेकंदांनी ही पॉड उपलब्ध असेल आणि प्रवाशांनी निवडलेल्या स्थानकवरच ती थांबेल.

**<u>सुजाता शर्मा</u>**

पश्चिम आशियातील घडामोडींच्या पार्श्वभूमीवर देशातील पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीचा पुरवठा पूर्णपणे सामान्य असल्याचा पुनरुच्चार काल केंद्र सरकारने केला. नवी दिल्ली इथं आयोजित आंतर-मंत्रालयीन पत्रकार परिषदेत पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी ही माहिती दिली. एलपीजीचं ऑनलाइन बुकिंग आता 96 टक्क्यांपर्यंत पोहोचलं आहे. स्थलांतरित कामगारांना दिल्या जाणाऱ्या पाच किलोच्या एलपीजी सिलेंडरचं वितरण दुप्पट करण्यात आल्याचं शर्मा यांनी सांगितलं. पश्चिम आशियातील 16 भारतीय जहाजांवरील सर्व 433 भारतीय खलाशी सुरक्षित असल्याची माहिती बंदर आणि जहाजबांधणी मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव मुकेश मंगल यांनी दिली.

दरम्यान, पश्चिम आशियातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी इस्त्रायल-अमेरिका-ईराणदरम्यान दोन आठवड्यासाठी युध्दबंदीची घोषणा करत असल्याचं काही वेळापुर्वीच समाजमाध्यमावरील संदेशात केली आहे. इराणवरील हल्ले थांबल्यास, आपणही प्रत्यत्तरादाखल करत असलेले हल्ले थांबवणार असल्याचं इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांनी म्हटलं आहे.  होर्मुझची सामुद्रधुनी पुढील दोन आठवड्यासाठी खुली करणार असल्याचं आश्वासन इराणनं दिलं आहे.

**<u>पोटनिवडणूक</u>**

अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत 30 उमेदवारांनी 42 उमेदवारी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी 7 अर्ज छाननीत बाद झाल्यानंतर 23 उमेदवार रिंगणात आहेत. त्यामधे भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, वंचित बहुजन पार्टी अणि उर्वरित अपक्ष उमेदवार आहेत.

**<u>योगलोणार</u>**

बुलडाणा जिल्ह्यातील लोणार सरोवर परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज उद्यानात काल योग महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं होतं. केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यावेळी उपस्थित होते. आगामी योग दिनाच्या 75 दिवसांच्या उलटगणनेची सुरुवात म्हणून आयुष मंत्रालया अंतर्गत मोरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्थेनं याचं आयोजन केलं होतं. या महोत्सवात पाच हजार जणांनी एकत्रित त्रिकोणासन सादर केला. या उपक्रमाची 'एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स' मध्ये नोंद झाली. यावेळी जाधव यांनी 'आयुष आहारा'चे महत्त्व अधोरेखित करत पारंपरिक आणि  नैसर्गिक आहारावर भर देण्याचे आवाहन केलं. या महोत्सवाबाबत बोलताना ते म्हणाले.....

**आपल्या सर्वांना माहीत आहे की एकवीस जून हा संपूर्ण जगामध्ये योग दिवस म्हणून साजरा केला जातो त्या एकवीस जूनच्या अगोदर ते जे शंभर दिवस असतात त्या शंभर दिवसांमध्ये आपण काऊंट डाऊन कार्यक्रम करतो ते शंभर दिवसांमध्ये देशातल्या शंभर मोठमोठ्या शहरांमध्ये हे कार्यक्रम होतात त्यातला हा पंच्याहत्तर दिवस अगोदरचा काउंट डाऊन कार्यक्रम आपल्या लोणार येथील जे जगप्रसिद्ध खाऱ्या पाण्याचं सरोवर आहे आणि फार मोठं महत्व आपल्या लोणार शहराला सुद्धा आहे अनेक पर्यटक जगभरातून या ठिकाणी येतात त्या ठिकाणावर हे नियोजन घेण्याचं आम्ही नियोजन केलं आणि आज मला सांगायला अतिशय आनंद होतो की आज एकाच वेळेस या ठिकाणी सहा हजारापेक्षा जास्त लोकांनी योगाभ्यास योग साधना या ठिकाणी केलेली आहे.**

## पुरस्कार-मुंबई

यंदाचा 'लता दीनानाथ मंगेशकर पुरस्कार' नोबेल पुरस्कार विजेते कैलास सत्यार्थी यांना जाहीर झाला आहे. ज्येष्ठ संगीतकार पंडित हृदयनाथ मंगेशकर यांनी काल या पुरस्काराची घोषणा केली. मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्या 84व्या स्मृतिदिनी हा पुरस्कार प्रदान केला जाईल. यंदाच्या पुरस्कार विजेत्यांमध्ये संगीत क्षेत्रासाठी महेश काळे, नृत्यासाठी शमा भाटे, नाटक आणि चित्रपट क्षेत्रासाठी अभिनेता सुबोध भावे, चित्रपट क्षेत्रासाठी अभिनेत्री रवीना टंडन आणि प्राजक्ता माळी, पत्रकारिता क्षेत्रासाठी सुशील कुलकर्णी तर साहित्याच्या क्षेत्रात अच्युत गोडबोले यांचा पुरस्कारार्थींमध्ये समावेश आहे.

## नेत्रहीन जलतरणपटू

नागपूरच्या 17 वर्षीय नेत्रहीन जलतरणपटू ईश्वरी पांडे हिने 6 एप्रिल रोजी पाल्कची सामुद्रधुनी पार करत ऐतिहासिक कामगिरी केली आहे. अशी कामगिरी करणारी ती जगातली पहिली पूर्णपणे नेत्रहीन जलतरणपटू ठरली आहे. ईश्वरी

श्रीलंकेतील उर्मलाई पॉइंट इथून 11 तास 15 मिनिटांत 29 किलोमीटर अंतर पार करत धनुषकोडी इथं पोहोचली. समुद्रातील तीव्र प्रवाह, भरती-ओहोटी आणि जेलीफिशचा सामना करत तिनं अद्वितीय धाडस दाखवत ही कामिगिरी साध्य केली.

**<u>नौकानयन-सांगली</u>**

सांगलीमध्ये सुरू असलेल्या आंतरविद्यापीठ कयाकिंग आणि कॅनॉईंग स्पर्धेत काल 500 मीटर शर्यतींमध्ये चंदीगडचं पंजाब विद्यापीठ, आणि अमृतसरच्या गुरु नानक देव विद्यापीठानं दमदार कामगिरी करत वर्चस्व गाजवलं. विविध प्रकारांमध्ये या विद्यापीठांच्या नौकानयनपटूंनी सुवर्णपदकं पटकावली.

**<u>हवामान</u>**

आज राज्यात हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**